पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/०४/कावि/२६/२०२२
दिनांक : २१/०१/२०२२

प्रति,

मा......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दि.**२७/०१/२०२२** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा गुरुवार, दिनांक **२७/०१/२०२२** रोजी **दु.२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरिल मा. सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ०६**

**दिनांक : २७/०१/२०२२** **वेळ : दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड म्हानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा गुरुवार, दिनांक **२७/०१/२०२२** रोजी **दु.२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरिल मा. सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) मा. महिला व बालकल्याण समिती सभा ( **कार्यपत्रिका क्रमांक ०५**) दिनांक **१३/०१/२०२२** चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्रमांक१) पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविणेत येतात. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील महिला बचतगट, महिला, मुली व मुले यांच्या विविध कल्याणकारी योजनांच्या पार्श्वभूमीनुसार पुढील ५ वर्षासाठी रोडमॅपबाबतचे व्हीजन तयार करुन अधिकाधिक महिला बचतगट, महिला, मुले / मुलींपर्यंत विविध कल्याणकारी योजनांची माहिती तसेच लाभ यांबाबत अधिकाधिक प्रसार होऊन लाभार्थ्यांपर्यंत लाभ देण्याची प्रक्रिया सुलभतेने होणेकामी याबाबत उपक्रम राबविणे आवश्यक आहे. मा.उप आयुक्त (नाविया), समाज विकास अधिकारी (नाविया) आणि टाटा स्ट्राईव्ह या संस्थेकडील प्रतिनिधी यांच्या समवेत दिनांक २५/११/२०२१ रोजी बैठक झालेली असून सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार टाटा स्ट्राईव्ह या संस्थेकडील प्रतिनिधी यांनी दिनांक २५/११/२०२१ रोजीच्या ई-मेलद्वारे मनपा हद्दीमधील महिला बचतगट, महिला, मुली व मुले यांच्याकरीता असणा-या विविध कल्याणकारी योजनांच्या पार्श्वभूमीनुसार पुढील ५ वर्षासाठी रोडमॅपबाबतचे व्हीजन तयार करणेबाबतची माहिती, याकामी लागणारा आवश्यक खर्च याबाबतची माहिती नागरवस्ती विकास योजना विभागास पाठविलेली आहे. खालील तक्तयात नमूद केलेप्रमाणे टाटा स्ट्राईव्ह या संस्थेने प्रस्ताव सादर केला आहे.

| **अ.क्र** | **तपशील** | **याकामी लागणारी रक्कम** |
|---|---|---|
| १ | मानवी संसाधने | १४,००,०००/- |
| २ | प्रवास आणि निवास | ३,५०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | निदान अभ्यास | १५,५०,०००/ |
| ४ | प्राथमिक डेटा संकलन | १०,२०,०००/ |
| ५ | दुय्यम संशोधन | ७०,०००/ |
| ६ | डेटा पडताळणी करणे आणि अहवाल | १,३०,०००/ |
| ७ | अभ्यास व्यवस्थापन | ३,३०,०००/ |
| | **एकुण** | **३३,००,०००/-** |

प्रस्तावातील प्रत्येक तपशील महिला बचतगट, महिला, मुली व मुले यांच्या विविध कल्याणकारी योजनांच्या पार्श्वभूमीनुसार करणेत येणा-या व्हीजननुसार प्रस्तावित केलेला आहे असे कळविण्यात आलेले आहे. तरी उपरोक्त प्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील महिला बचतगट, महिला, मुली व मुले यांच्या विविध कल्याणकारी योजनांच्या पार्श्वभूमीनुसार पुढील ५ वर्षासाठी व्हीजन तयार करणे आवश्यक आहे. त्यामुळे **टाटा स्ट्राईव्ह** या संस्थेकडून विविध कल्याणकारी योजनांसाठी रोडमॅप तयार करुन घेणे हे काम विना-निविदा सदर संस्थेस देणे व त्याकामी येणा-या र.रु.३३,००,०००/-(अक्षरी र.रु.तेहतीस लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक २७/०१/२०२२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपलिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/२६/२०२२
दिनांक : २१/०१/२०२२ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.